# दिव्याची जगज्जेतीवर मात

## 'आर्मागेडॉन' डावात वेन्जूनवर सरशी; गुकेश, प्रज्ञानंदचाही विजय

**वृत्तसंस्था, ओस्लो**

**भारताची युवा** ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने प्रतिष्ठेच्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत संस्मरणीय पदार्पण करताना पहिल्याच फेरीत महिला जगजेत्या जू वेन्जूनचा 'आर्मागेडॉन' डावात पराभव केला. विशेष म्हणजे, नागपूरच्या २० वर्षीय दिव्याने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना बाजी मारली. खुल्या विभागात जगज्जेता दोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद या भारतीयांनीही सकारात्मक सुरुवात केली.

रेटी/कॅटलान पद्धतीने खेळल्या गेलेल्या लढतीत दिव्याने पटाच्या मध्यभागावर नियंत्रण राखत जू वेन्जूनला प्रत्येक चालीसाठी विचार करायला भाग पाडले. दिव्याने हत्तीचा प्रभावी वापर करत बचाव भक्कम ठेवला. वेन्जूनने राजाच्या बाजूने आक्रमक चाली रचण्याचा प्रयत्न केला, पण दिव्याने अचूक खेळ करत वेन्जूनच्या राजावर दडपण निर्माण केले. अखेरीस ५२ चालींनंतर पारंपरिक डाव बरोबरीत सुटला. त्यानंतर बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या 'आर्मागेडॉन' डावात दिव्याने शानदार खेळ करत विजय मिळवला.

'आर्मागेडॉन' डावात पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला १० मिनिटे, तर काळ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला ७ मिनिटांचा वेळ दिला जातो. पांढऱ्या मोहऱ्यांनी विजय मिळवणे आवश्यक असते, तर काळ्या मोहऱ्यांनी बरोबरीही पुरेशी ठरते. या दडपणाखाली दिव्याने संयम राखत विजय मिळवला. तिने अश्वाच्या अप्रतिम चालीने वेन्जूनला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. त्या चालीमुळे वेन्जूनवर वजीर गमावण्याची वेळ आली आणि त्यानंतर पुनरागमन करणे तिला अशक्य झाले.

खुल्या विभागात गुकेश आणि प्रज्ञानंद यांनी आपल्या सामन्यांत 'आर्मागेडॉन' टायब्रेकमध्ये विजय मिळवला. गुकेशला जर्मनीचा ग्रँडमास्टर व्हिन्सेन्ट केमेरविरुद्ध संघर्ष करावा लागला. या दोघांमधील पारंपरिक डाव जवळपास पाच तास आणि १४४ चालींनंतर बरोबरीत सुटला. त्यानंतर टायब्रेकमध्ये गुकेश विजयी ठरला. दुसरीकडे, प्रज्ञानानंदने अमेरिकेचा ग्रँडमास्टर वेस्ली सो याच्याविरुद्ध पारंपरिक डाव बरोबरीत सोडवल्यानंतर 'आर्मागेडॉन'मध्ये बाजी मारत १.५ गुण मिळवला.

महिला विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पीने मात्र निराशाजनक कामगिरी केली. तिला बिबिसारा असाउबायेवाने पारंपरिक डावातच पराभूत केले.

**कार्लसनला धक्का :** मायदेशात विक्रमी आठव्या जेतेपदासाठी प्रयत्नशील असलेल्या मॅग्नस कार्लसनला पहिल्याच फेरीत पराभवाचा धक्का बसला. फ्रान्सच्या अलिरेझा फिरुझाने पाच वेळच्या जगज्जेत्या कार्लसनवर पारंपरिक डावातच मात केली. पायाला दुखापत असूनही या स्पर्धेत सहभाग नोंदवणाऱ्या फिरुझाचा कार्लसनवर हा पहिला 'पारंपरिक' विजय ठरला. "फिरुझाने मला सतत दडपणाखाली ठेवले आणि माझ्याकडून चुका झाल्या,' असे कार्लसनने लढतीनंतर मान्य केले.

# इंधन दरवाढीमुळे महागाईच्या लाटेचा इशारा

## जूनपर्यंत दर ५ टक्क्यांवर जाण्याचा अर्थतज्ज्ञांचा अंदाज

**पीटीआय, नवी दिल्ली**

**इंधनाच्या किमतीत** चौथ्यांदा झालेली वाढ आणि सोने व चांदीवरील आयात शुल्कात वाढविले गेल्यामुळे येत्या जूनमध्ये किरकोळ महागाईचा दर दोन वर्षात प्रथमच ५ टक्क्यांवर जाईल. मोठ्या प्रयत्नांनंतर काबूत आलेल्या महागाईच्या नव्याने लाट उसळण्याचा हा परिणाम पाहता, आर्थिक वर्षातील दुसऱ्या सहामाहीत रिझर्व्ह बँक व्याजदरात वाढ देखील करेल, असा अंदाज मंगळवारी अर्थतज्ज्ञांनी वर्तविला.

देशभरात १५ मेपासून अकरा दिवसांत पेट्रोलच्या दरात लिटरमागे ७.३८ रुपये, तर डिझेलच्या दरात ७.४८ रुपये वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम विशेषतः वाहतूक आणि साठवणूक क्षेत्रावर गंभीरपणे जाणवणार असून, वीजनिर्मितीवर काही अंशी परिणाम होईल. याचबरोबर सरकारने १३ मे रोजी सोने आणि चांदीवरील आयात शुल्क वाढवून १५ टक्के केले असून, याचाही परिणाम महागाईवर होईल.

मे महिन्यातील किरकोळ महागाईची आकडेवारी १२ जूनला जाहीर होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर 'ईवाय इंडिया'चे मुख्य धोरण सल्लागार डी.के.श्रीवास्तव म्हणाले की, पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतीत प्रति लिटर सरासरी ७.५ रुपये वाढ झाल्यास किरकोळ महागाईत पाऊण टक्का वाढ होईल. किरकोळ महागाईचा दर मे महिन्यात ४ ते ४.५ टक्के राहील. जूनमध्ये हा दर ४.५ ते ५ टक्क्यांवर जाईल. इंधन दरवाढीमुळे होणारा परिणाम स्थिरावण्याची प्रतीक्षा रिझर्व्ह बँक करेल आणि त्यानंतरच्या तिमाहीत व्याजदर वाढीबाबत निर्णय घेतला जाईल.

किरकोळ महागाईचा दर ५ टक्क्यांच्या पुढे गेल्यास रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर वाढ सुरू होईल. तथापि महागाईतील वाढ ही किमती वाढल्याने होणार असल्याने त्यावर नियंत्रण म्हणून व्याजदरात वाढ केली तरी त्याचा परिणाम मर्यादितच राहिल, असेही श्रीवास्तव म्हणाले.

बार्कलेज इंडियाच्या मुख्य अर्थतज्ज्ञ आस्था गुडवानी म्हणाल्या की, रिझर्व्ह बँकेकडून जूनमधील पतधोरणात व्याजदरात बदल केले जाणार नाहीत. सध्याची अस्थिर परिस्थिती आणि इंधन दरवाढीचा वाहतूक, प्रवास भाडे व कच्च्या मालाच्या किमतीवर होणारा परिणाम यामुळे चालू आर्थिक वर्षातील दुसऱ्या सहामाहीत महागाईत मोठी वाढ होईल. महागाई आटोक्याबाहेर गेल्यास व्याजदर वाढ करणे अपरिहार्य ठरेल.

### जूनमधील पतधोरण स्थिर?

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या द्वैमासिक बैठकीचे निर्णय ५ जूनला जाहीर होतील. या बैठकीत व्याजदर स्थिर ठेवले जातील, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. घाऊक महागाईचा दर एप्रिलमध्ये ८.३ टक्के या ४२ महिन्यांतील उच्चांकी पातळीवर पोहोचला, तर किरकोळ महागाई दर ३.४८ टक्के नोंदविण्यात आला. रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर ठरविताना प्रामुख्याने किरकोळ महागाई दराचा विचार केला जातो. तथापि या बैठकीत, चालू आर्थिक वर्षातील किरकोळ महागाई दराचा अंदाज ४.६ वरून ५ टक्क्यांवर नेला जाईल. याचबरोबर विकास दराचा अंदाज ६.९ वरून ६.७ टक्क्यांपर्यंत खाली आणला जाण्याची शक्यता आहे.

# टाटा सन्सची बैठक पुन्हा निर्णयाविना?

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** देशातील आघाडीच्या टाटा उद्योग समूहाची पालक कंपनी असलेल्या टाटा सन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालक मंडळाची अनेकांगाने महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी तब्बल पाच तास चालली. बैठकीनंतर सर्व संचालकांनी निर्णयाबाबत कमालीचे मौन बाळगले असले तरी प्रत्यक्षात कोणत्याही औपचारिक निर्णयाविनाच बैठक उरकण्यात आली, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

या बैठकीसाठी टाटा समूहाचे मुख्यालय असलेल्या बॉम्बे हाऊसमध्ये टाटा सन्सचे सर्व संचालक आणि टाटा कुटुंबातील सदस्य आणि टाटा न्यासांचे अध्यक्ष नोएल टाटा हे सकाळीच दाखल झाले. एकंदर पाच तास ही बैठक चालली. त्यानंतर दुपारी उशिराने सर्व संचालक तेथून बाहेर पडले. टाटा सन्सचे अध्यक्ष एन.चंद्रशेखरन यांनीही माध्यमांशी बैठकीतील निर्णयांबाबत बोलणे टाळले. या बैठकीत त्यांच्या पुनर्नियुक्तीच्या मुद्द्यावर चर्चा झाली नसल्याचे समजते.

टाटा समूहातील कंपन्यांच्या आर्थिक कामगिरीबाबत चंद्रशेखरन आणि नोएल टाटा या दोघांमध्ये मागील आठवड्याच्या अखेरीस चर्चा झाल्याचे सांगितले जाते.

# पाटीदारच्या झंझावातापुढे गुजरातची शरणागती

## बंगळूरु सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत

**वृत्तसंस्था, धरमशाला**

**कर्णधार रजत** पाटीदारच्या (३३ चेंडूंत नाबाद ९३) झंझावाती खेळीच्या जोरावर गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने मंगळवारी 'क्वालिफायर-१'च्या सामन्यात गुजरात टायटन्सचा ९२ धावांनी धुव्वा उडवत सलग दुसऱ्यांदा 'आयपीएल'ची अंतिम फेरी गाठली. गुजरातने या सामन्यात निराशाजनक कामगिरी केली असली, तर अंतिम फेरी गाठण्याची त्यांना आणखी एक संधी मिळेल. यासाठी त्यांना शुक्रवारी 'क्वालिफायर-२'च्या सामन्यात खेळावे लागेल.

धरमशाला येथे झालेल्या 'क्वालिफायर-१'च्या सामन्यात गुजरातचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून फलंदाजीचे आमंत्रण दिल्यावर बंगळूरुने २० षटकांत ५ बाद २५४ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात गुजरातचा संघ १६२ धावांत गारद झाला. साई सुदर्शन (१४), गिल (२) आणि जोस बटलर (२९) हे भरवशाचे फलंदाज सुरुवातीलाच माघारी परतले. या धक्क्यांतून गुजरातचा संघ सावरूच शकला नाही. त्यातही साई सुदर्शन दुर्दैवी ठरला. त्याने जेकब डफीच्या चेंडूवर फटका मारला. मात्र, त्यानंतर त्याच्या हातून बॅट सुटली आणि यष्टिंवर आदळली. त्यामुळे तो 'स्वयंचित' झाला. त्यानंतर राहुल तेवातियाने (४३ चेंडूंत ६८) एकाकी लढा दिला.

त्याआधी, पाटीदारच्या वादळी खेळीपुढे गुजरातच्या गोलंदाजांनी शरणागती पत्करली. बंगळूरुने अखेरच्या सहा षटकांत तब्बल ११४ धावा फटकावल्या. पाटीदारला दोनवेळा जीवदान मिळाले आणि याचा त्याने पुरेपूर फायदा घेतला. त्याने कृणाल पंड्या (४३) याच्या साथीने चौथ्या गड्यासाठी ४५ चेंडूंत ९५ धावा जोडल्या. पाटीदारने विशेषतः वेगवान गोलंदाजांना लक्ष्य केले. गुजरातसाठी जेसन होल्डरने (२/३९) प्रभावी गोलंदाजी केली. त्याने विराट कोहली (४३) आणि देवदत्त पडिक्कल (३०) यांना मधल्या षटकांत माघारी धाडले. मात्र, त्यानंतर पाटीदारने गुजरातला पूर्णपणे निष्प्रभ केले.

### संक्षिप्त धावफलक

- **रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु :** २० षटकांत ५ बाद २५४ (रजत पाटीदार नाबाद ९३, विराट कोहली ४३, कृणाल पंड्या ४३; जेसन होल्डर २/३९, कगिसो रबाडा २/५४) विजयी वि.
- **गुजरात टायटन्स :** १९.३ षटकांत सर्वबाद १६२ (राहुल तेवातिया ६८, जोस बटलर २९; जेकब डफी ३/३९, कृणाल पंड्या २/१६, रसिक दार २/२४, भुवनेश्वर कुमार २/२८)

# राजस्थान-हैदराबाद आज आमनेसामने

**मुल्लानपूर :** राजस्थान रॉयल्स संघात वैभव सूर्यवंशी, यशस्वी जैस्वाल, तर सनरायजर्स हैदराबाद संघात अभिषेक शर्मा, ट्रॅव्हिस हेड, इशान किशन आणि हेन्रिक क्लासन यांसारख्या तडाखेबंद फलंदाजांच्या उपस्थितीमुळे 'आयपीएल'मध्ये आज, बुधवारी होणाऱ्या 'एलिमिनेटर'च्या सामन्यात मोठ्या धावसंख्येची अपेक्षा बाळगली जात आहे.

या सामन्यातील विजेता संघ 'क्वालिफायर-२'साठी पात्र ठरेल, तर पराभूत होणाऱ्या संघाचे आव्हान संपुष्टात येईल. त्यामुळे दोन्ही संघ सर्वोत्तम कामगिरीसाठीच प्रयत्नशील असतील.

न्यू चंडीगडच्या मुल्लानपूर येथील मैदानाची खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल मानली जाते. त्यामुळे या सामन्यात राजस्थानची भिस्त सूर्यवंशी आणि जैस्वाल या सलामीवीरांवरच असेल. साखळी फेरीत सूर्यवंशीने (३७ चेंडूंत १०३) हैदराबादविरुद्ध शानदार शतक केले होते. आता याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा त्याचा मानस असेल. गोलंदाजीत जोफ्रा आर्चरची भूमिका निर्णय ठरू शकेल.

- **वेळ :** सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

# मोन्फिसचाही फ्रेंच स्पर्धेला पहिल्याच फेरीत निरोप

**पॅरिस :** स्टॅनिस्लास वावरिंका याच्यापाठोपाठ गेल मोन्फिसनेही फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेला पहिल्याच फेरीत निरोप दिला. दोघेही कारकीर्दीतील अखेरच्या फ्रेंच स्पर्धेत खेळत होते. पुरुष एकेरीतच माजी ग्रँडस्लॅम विजेत्या डॅनिल मेदवेदेव यालाही पराभवाचा धक्का बसला.

वयाच्या ३९व्या वर्षी अखेरच्या 'रोलँड गेरॉं' स्पर्धेत खेळणाऱ्या मोन्फिसला फ्रान्सच्याच ह्युगो गॅस्टनकडून ६-२, ६-३, ३-६, २-६, ६-० असा पराभव पत्करावा लागला. मोन्फिसने २१ वर्षांपूर्वी या स्पर्धेत पदार्पण केले होते. त्यानंतर त्याला एकाही ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचता आले नसले, तरी त्याची लोकप्रियता प्रचंड होती.

सहाव्या मानांकित डॅनिल मेदवेदेवला पहिल्याच फेरीत आव्हान गमवावे लागले. बिगरमानांकित ऑस्ट्रेलियाच्या ॲडम वॉल्टनने त्याचा ६-२, १-६, ६-१, १-६, ६-४ असा पराभव केला.

**महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित**
महाप्रित
(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
**ई-आरएफक्यू निविदा सूचना**
महाप्रित, तलाव/ पोखर/ नदी यांसारख्या **जलस्रोतांच्या स्वच्छता व पुनरुज्जीवन कार्यासाठी** संस्थांना एम्पॅनेलमेंट करण्याकरीता ऑनलाईन **Request for Qualificatlon (e-RFQ)** आमंत्रित करीत आहे. निविदा कागदपत्रे अधिकृत संकेतस्थळ **https://mahapreit.in** तसेच **https://mahatenders.gov.in** येथे पाहता व डाउनलोड करता येतील. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख **१२/०६/२०२६** राहील.
**Sd/-**
**व्यवस्थापकीय संचालक महाप्रित**

**फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड.**
**महाराष्ट्र शासनाचा उपक्रम**
**CIN No.-U45200MH1974SGC017206**
**ई-लिलाव लिलावाची सुचना**
w.fdcm.co.in Email : dmballarshah@rediffmail.com
**बल्लारशाह, दि. 26.05.2026**
ईच्छुक वनोपज खरेदीदांराना कळविण्यात येते की, नवीन/ तहकुब/पुर्नविक्री-इमारत, फाटे वनोपजाचा ई - लिलाव खालील विभागनिहाय होणार आहे.

| अ.क्र. | विभाग | लिलावाचा प्रकार व ठिकाण | वनोपज | दिनांक | वेळ पासुन पर्यंत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ब्रम्हपुरी वन प्रकल्प विभाग, ब्रम्हपुरी | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - साग इमारत/फाटे | दि. 1 जून, 2026 | सकाळी 09.30 ते दुपार. 12.30 पर्यंत |
| | | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - आडजात इमारत/फाटे | दि. 11 जून, 2026 | सकाळी 09.30 ते सांय. 06.30 पर्यंत |
| 2 | मार्खंडा वन प्रकल्प विभाग, बल्लारशाह | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - साग इमारत/फाटे | दि. 1 जून, 2026 | दुपार 12.30 ते दुपार. 1.30 पर्यंत |
| | | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - आडजात इमारत/फाटे | दि. 12 जून, 2026 | सकाळी 09.30 ते सकाळ. 11.05 पर्यंत |
| 3 | चंद्रपूर वन प्रकल्प विभाग, चंद्रपूर | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - साग इमारत/फाटे | दि. 1 जून, 2026 | दुपार 2.30 ते सांय. 06.30 पर्यंत |
| | | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - आडजात इमारत/फाटे | दि. 12 जून, 2026 | सकाळी 11.05 ते सांय. 06.30 पर्यंत |
| 4 | बल्लारशाह विक्री आगार | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - साग इमारत/फाटे | दि. 2 ते 6 व 8 ते 09 जून, 2026 | सकाळी 09.30 ते सांय. 06.30 पर्यंत |
| | | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - आडजात इमारत/फाटे | दि. 13 व 15, 16 जून, 2026 | सकाळी 09.30 ते सांय. 06.30 पर्यंत |
| 4 | नागेपल्ली विक्री आगार | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - साग इमारत/फाटे | दि. 10 जून, 2026 | सकाळी 09.30 ते सांय. 06.30 पर्यंत |
| | | ई-लिलाव | **नवीन/ तहकुब** - आडजात इमारत/फाटे | दि. 17 व 18जून, 2026 | सकाळी 09.30 ते सांय. 06.30 पर्यंत |

विभागीय व्यवस्थापक,
एफडीसीएम लिमी., आगार विभाग,
बल्लारशाह.

**महाराष्ट्र शासन**
**सहाय्यक अभियंता (श्रेणी-1)**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग कुही**
ई-मेलः-kuhi.dc.mahapwd.gov.in
**निविदा सूचना**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) शासन निर्णय क्र. मग्रारो-2025/प्र.क. 49/रोहयो-6अ मुंबई दि. 10.10.2025 अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मातोश्री ग्राम समृध्दी सडक शेत / पांधण रस्ता बांधकामाकरिता वस्तु व सेवा यांचा पुरवठा करण्यासाठी योजनेअंतर्गत कामे हाती घेणाऱ्या क्षेत्रीय यंत्रणांनी शासनाचा विहीत नियमानुसार एकाच पुरवठादार याच्याकडून खरेदी करण्याचे असल्याने सा. बां. उपविभाग कुही या उपविभागीय स्तरावरील विविध गावांची अंदाजपत्रकातील बाबीनिहाय दरपत्रके हे या जाहीर निवीदा / Quotation द्वारे या उपविभागाच्या सुचना फलकावर (Notice Board) उपलब्ध असून सर्व पूरवठादारांना निवेदन करण्यात येते की, आपण सदर स्पर्धेत सहभागी होऊन आपली दराची दरपत्रक सा. बा. उपविभाग कुही येथे दि. 26.05.2026 रोजी दूपारी 02.00 वाजेपर्यंत न चूकता सादर करावे. कोरे दरपत्रक रू. 200/- चा भरणा करून सा. बां. उपविभाग कुही येथे कार्यालयीन वेळेत दि. 26.05.2026 दुपारी 12.00 वाजेपर्यंत शासन जमा करून प्राप्त करून घेता येतील.
स्वा/-
सहाय्यक अभियंता (श्रेणी-1)
सा. बां. उपविभाग
कुही
क्र.संमावज/नाग./139/2026

**SBI भारतीय स्टेट बँक State Bank of India**
गृह ऋण केन्द्र - II (64219), प्रशासकीय कार्यालय, एस.व्ही. पटेल मार्ग, पोस्ट बॉक्स नं. 37, नागपूर-440001. टेल. नं. 0712-6137438, फॅक्स नं. 0712-6137474, ई-मेल: sbi.64219@sbi.co.in
**ई-लिलाव सूचना**
**स्टेट बँक ऑफ इंडिया, गृह ऋण केंद्र-II नागपूर** खालील वाहनांच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना "जसे आहे तिथे आहे" आणि "जसे आहे तिथे" उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे करत आहेत.

| अनु. क्र. | कर्जदार आणि जमानतदारांचे नाव | वाहनाचे वर्णन | ई-लिलाव तारीख आणि वेळ | राखीव किंमत (रु.) | ईएमडी किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्रीमती चंद्रकला राजू सायम | Car : Maruti Suzuki SWIFT VXI<br>Make : Maruti Suzuki India Ltd.<br>Registration No.: MH 49 CL 5085<br>Year of Manufacturing: 2024<br>Color: Red<br>Chassis No. MBHZCDESKRK215247<br>Engine No. : 212EP1113311-<br>Fuel Type : Petrol | 10/06/2026 सकाळी 11:00 ते दुपारी 02:00 | रु. 430000/- | बयाणा रक्कम (ईएमडी) रु. 43000/- |

वरील वाहनाचा ई-लिलाव **दिनांक 10/06/2026 रोजी सकाळी 11:00 वाजेपासून दुपारी 02:00 वाजेपर्यंत** ऑनलाईन पद्धतीने **htttps://baanknet.com** या संकेतस्थळावर आयोजित करण्यात आला आहे.
सदर वाहनांची पाहणी करण्यास इच्छुक व्यक्तींनी **श्री. अजिंक्य फाटिंग मोबा. क्र. 8208985239 यांच्याशी दिनांक 08/06/2026 ते 09/06/2026 दरम्यान सकाळी 10:00 ते सायंकाळी 05:00 वाजेपर्यंत** संपर्क साधावा.
अधिक माहितीसाठी **भारतीय स्टेट बँक, शाखा गृह ऋण केंद्र-II नागपूर येथे श्रीमती अनुभूती त्रिपाठी** यांच्याशी संपर्क साधावा.
**ई-लिलावाच्या अटी व शर्ती:**
1. सदर वाहन "जसे आहे तसे" आणि "उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे" विक्रीस ठेवण्यात येत आहे.
2. कोणतीही कारणे न देता कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्याकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.
3. सदर वाहनाच्या हस्तांतरणाची पूर्ण जबाबदारी खरेदीदाराची राहील.
4. वाहन खरेदी करण्यापूर्वी त्याच्याविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदवलेला नाही याची खात्री करून घ्यावी.
5. बोली रक्कम किमान रु. 5,000/- ने वाढवावी.
6. यशस्वी खरेदीदारास लागू असलेल्या कायद्यानुसार विक्री किमतीवर जास्तीत जास्त 18% जीएसटी भरावा लागेल.
7. यशस्वी बोलीदाराने विक्री किमतीच्या 25% रक्कम लिलावाच्या त्याच दिवशी किंवा पुढील दिवशी जमा करावी व उर्वरित रक्कम सात दिवसांच्या आत भरावी. ठरविलेल्या मुदतीनंतर रक्कम न भरल्यास जमा केलेली रक्कम तसेच अर्नेस्ट मनी डिपॉझिट (EMD) जप्त करण्यात येईल.
**दिनांक : 27/05/2026, ठिकाण : नागपूर** **सही/- (अधिकृत अधिकारी), भारतीय स्टेट बँक गृह ऋण केंद्र -II, नागपूर**
टीप : मूळ इंग्रजीमधील जाहीरात ग्राहय धरण्यात येईल.

**इंडियन बैंक Indian Bank**
इलाहाबाद ALLAHABAD
**अंचल कार्यालय, नागपुर**
पाल्म रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर 440 001,
फोन:- ०७१२-२५३०६६६, २५६६७८४
ई-मेल: zonagpur@indianbank.co.in
**ई-लिलाव विक्री सुचना**
सिक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्तांचे पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम २००२ अंतर्गत, सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी नियम) २००२ च्या नियम ६(२) आणि ८(६) नुसार विक्रीची सूचना
सर्व साधारणपणे आणि खासकरून खालील नमूद कर्जदार व जमानतदार याना सूचित करण्यात येत आहे की, इंडियन बँकेकडे अचल संपत्ती / गहाण केलेल्या खाली नमूद मालमत्तेचे ताबा इंडियन बँकेच्या प्राधिकृत अधिका- याने घेतला आहे. सदर मालमत्ता ही सुरक्षित लेनदार खाली दिलेल्या तारखेला "जे आहे जेथे आहे" "जे आहे ते आहे" आणि "जेही काही आहे" या आधारावर विक्री करण्यात येईल खाली नमूद केले कर्जदार आणि जमानतदार संबंधित मालमत्तेसाठी राखिव किंमत आणि बयाणा रक्कम खालील प्रमाणे दिलेली आहे.
**ई-लिलावाची तारीख आणि वेळ तारीख : 06.07.2026 वेळ : स. 10.00 ते सायं. 05.00 वा पर्यंत**

| अ. क्र | कर्जदार आणि जमिनदाराचे नाव | स्थावर मालमत्तेचा आणि त्यावर जर काही बोजा असेल तर, त्याचा तपशील आणि ताब्याचा प्रकार व संपत्तीची आयडी BAANKNET | राखीव किंमत, बयाणा रक्कम, बोली वाढीव रक्कम |
|---|---|---|---|
| | **बजाज नगर शाखा (अधिकृत अधिकारी: श्री. कमलेश मदनलाल मुतकुरे मो. नं. 9921547236)** | | |
| 1. | **1) मेसर्स स्पार्कप्रिंट इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. (कर्जदार)** प्लॉट क्र. J-10, ग्राउंड फ्लोअर, नागराज अपार्टमेंट, लक्ष्मी नगर, नागपूर – 440022. **युनिटचा पत्ता :** प्लॉट क्र. C-161, बुटीबोरी एमआयडीसी (बोरी), जि. नागपूर. **2) श्री. क्रिष्णा सिंह चौहान (संचालक) पत्ता :** रा. प्लॉट क्र. E/8, फ्लॅट क्र. B-1, महालक्ष्मी अपार्टमेंट, गुप्ता नर्सिंग होम जवळ, लक्ष्मी नगर, राणाप्रताप नगर, नागपूर – 440022. **3) श्री. ओम जगदीश पटेल (संचालक) पत्ता :** रा. घर क्र. 843, वॉर्ड क्र. 4, नागपूर रोड, पवनार नाका, नालवाडी, वर्धा – 442001. **4) सौ. मृदवी देवेंद्र पुनेकर (जमानतदार) पत्ता :** रा. प्लॉट क्र. 38, हनुमान गल्ली, पुनेकर ज्वेलर्स, सीताबर्डी, परवर्धन ग्राउंड, नागपूर – 440012. | **ताब्याचा प्रकार - सांकेतिक** **संपत्ती आयडी : IDIB0SPARK** जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट/शेड/गाला/युनिट नं. सी-161 बुटीबोरी इंडस्ट्रियल एरिया एमआयडीसी नागपूर, गाव पोहा च्या हद्दिदत आणि नागपूर महानगर पालिकेच्या बाहेर, ग्रामिण एरिया ता. आणि नोंदणी उप जि. हिंगणा, जि. नागपूर समाविष्ट क्षेत्रफळ 600.00 चौ. मी. किंवा त्यासोबत फॅक्ट्री बिल्डींग बांधकाम तेथील बिल्ट अप एरिया क्षेत्रफळ सुमारे 268.983 (एफएसआय 0.44%) चौ. मी. मालक श्री. क्रिष्णा सिंघ चौहान आर/ओ नागपूर. **चतुसिंमा : पुर्व :** प्लाट नं. सी- 162, **पश्चिम :** एमआयडीसी 20.00 मी आर/डब्लु, **उत्तर :** एमआयडीसी 20.00 मी आर/डब्लु, **दक्षिण :** प्लॉट नं. सी-160. | राखीव किंमत: रु. 55,88,000/- बयाणा रक्कम: रु 5,58,800/- बोली वाढीव रक्कम : रु 10,000/- |

थकीत येणे बाकी रु. 1,00,04,226/- कर्ज खाते क्र. 7804856571 – टर्म लोन संदर्भात देय आहेत तसेच रु. 50,82,248/- कर्ज खाते क्र. 7804880978 – ओ.सी.सी. (ओपन कॅश क्रेडिट लिमिट) 06.02.2026 रोजी पुढील व्याज, खर्च, इतर शुल्क आणि त्यावरील खर्चासह.
**पूर्वीचा भार: बँकेला माहिती नाही.**
ऑनलाइन बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी बोलीदारांना आमच्या ई-लिलाव सेवा प्रदात्या **पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या** वेबसाइट **(https://baanknet.com)** ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तांत्रिक सहाय्यासाठी कृपया पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या हेल्पडेस्क क्रमांक **8291220220, ईमेल आयडी:- support.baanknet@psballiance.com** आणि सेवा प्रदात्याच्या मदत डेस्कमध्ये उपलब्ध असलेल्या इतर हेल्पलाइन क्रमांकांवर कॉल करा. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडसह नोंदणी स्थिती आणि ईएमडी स्थितीसाठी, कृपया **support.baanknet@psballiance.com** वर संपर्क साधा. मालमत्तेचे तपशील आणि छायाचित्र आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीसाठी कृपया **https://baanknet.com** ला भेट द्या आणि या पोर्टलशी संबंधित स्पष्टीकरणांसाठी, कृपया **हेल्पडेस्क क्रमांक 8291220220** वर संपर्क साधा. **https://baanknet.com** वरील वेबसाइटमध्ये मालमत्ता शोधताना बोलीदारांना वर नमूद केलेला प्रॉपर्टी आयडी क्रमांक वापरण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
**ही नोटीस वरील कर्ज संदर्भात कर्जदार / हमीदार / गहाणदार यांना दिली जात असून, निर्धारित तारखेच्या नियोजित विक्रीसंबंधी तसेच इतर संबंधित तपशीलांसह ही नोटीस जारी करण्यात येत आहे.**
**दिनांक : 25.05.2026**
**स्थळ : नागपुर**
नोट : संबंधित जाहिरातीचे भाषांतर इंग्रजीवरून करण्यात आले आहे, तरी अधिक अचूक माहितीसाठी इंग्रजी जाहिरात ग्राह्य धरण्यात यावे.
**प्राधिकृत अधिकारी, इंडियन बँक**

**दि. यवतमाळ अर्बन को-ऑपरेटीव्ह, बँक लि. शाखा-देवनगर, नागपूर**
**स्थावर मालमत्ता जाहीर लिलाव (दुसरी वेळ)**
खालील नमुद केलेल्या थकबाकीदारांनी त्यांच्या नावासमोर दर्शविलेली रक्कम वेळोवेळी मागणी नोटीस, सूचना, समन्सेस देउनही बँकेकडे भरणा न केल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार गहाणात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्री संबंधी सूचना देउनही अद्यापपावेतो थकबाकीदारांनी रक्कमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे थकबाकीदारांच्या नावासमोर दर्शविलेली मालमत्ता जसे आहे तसे व आहे त्याच स्थितीत खालील लिलावाच्या ठिकाणी व दिलेल्या वेळेवर जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे.तरी ईच्छुक खरेदीदारानी लिलावाचे ठिकाणी वेळेवर उपस्थीत राहावे

| शाखा व खाते क्रमांक तसेच थकबाकीदार व गहाणदारांचे नांव व पत्ता. | थकीत कर्जबाकी/ लिलावचे ठिकाण, लिलावची तारीख व वेळ | लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन (चतु:सिमा) | स्थावर मालमत्तेचे निर्धारित विक्री मुल्य (अपसेट सेल प्राईस) |
|---|---|---|---|
| शाखा देव नगर नागपुर खाते क्र १७२/१३६<br>१) कर्जदार डेअरी वर्ल्ड प्रोप्रा. आशिष अरविंद पन्नासे,(कर्जदार) रा